# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १३ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- रस्ते अपघातातल्या जखमींवर उपचारासाठी देशभरात लवकरच रोखरहित उपचार सेवा–केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची लोकसभेत माहिती.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात बँकिंग क्षेत्रात आमुलाग्र बदल –केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन.
- ‘मागेल त्याला सौर कृषी पंप’ योजनेत एक लाखांहून अधिक पंप बसवण्याचा टप्पा पूर्ण–सर्वाधिक सुमारे १६ हजार पंप बसवून जालना जिल्हा अव्वल.

आणि

- फिडे बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत अटीतटीच्या लढतीनंतर भारताचा डी. गुकेश विश्वविजेता.

****

रस्ते अपघातातल्या जखमींवर उपचारासाठी देशभरात लवकरच रोखरहित उपचार सेवा सुरू करण्यात येणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी काल लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात ही माहिती दिली. या योजनेमुळे रस्ते अपघातातल्या जखमींना रुग्णालयात सात दिवस किंवा दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचार रोखरहित पद्धतीने मिळू शकतील, असं गडकरी यांनी सांगितलं. ते म्हणाले…

> ***इसमे जो व्हेईकल इन्शुरन्स होगा उसमे सात दिन तक का खर्चा या देड लाख रुपये वो उनको तुरंत मिल जायेगा। मै उनको और बताना चाहतां हूं, उत्तर प्रदेश में ही इसकी शुरुवात हो रही है। और अगले तीन महिने मे ये पूरे देश में ये योजना की सुरुवात करेंगे।***

****

दरम्यान, लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात काल महाराष्ट्रातल्या रस्त्यांबाबत अनेक सदस्यांनी प्रश्न विचारले. धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी धाराशिव शहर, सुरत – चेन्नई महामार्गाला जोडण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला, तेव्हा यासंदर्भात विचार करण्याचं आश्वासन गडकरी यांनी दिलं. उमरगा – सोलापूर राष्ट्रीय महामार्ग अद्याप पूर्ण झाला नसून, त्यामुळे या रस्त्यावर अपघातांचं प्रमाण वाढत असल्याकडेही खासदार निंबाळकर यांनी लक्ष वेधलं. तसंच टेंभुर्णी – लातूर मार्गाचं चौपदरीकरणासंदर्भात विचारणा केली. गडकरी यांनी यावर बोलतांना एका महिन्यात यासंदर्भात निविदा काढण्यात येणार असल्याची माहिती दिली.

परभणीचे खासदार संजय जाधव यांनी परभणीला राष्ट्रीय किंवा राज्यमार्गाला जोडण्यासाठी विनंती केली. यावर बोलताना गडकरी यांनी, महाराष्ट्रात ७८ प्रकल्प सुरु असून, लवकरात लवकर ते पूर्ण केले जातील, असं आश्वासन दिलं.

शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाघचौरे यांनी अहिल्यानगर – शिर्डी मार्गाच्या दूरावस्थेकडे लक्ष वेधलं. यासंदर्भात, १५ दिवसांचं टेंडर काढून कामाला सुरुवात करणार असल्याचं गडकरी यांनी सांगितलं. रस्त्यांच्या कामात दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्यासाठी कायदा करण्याची मागणी वाघचौरे यांनी केली. त्यावर बोलतांना, कंत्राटदारांसाठी पूर्वी शिथिल केलेले नियम आता पुन्हा कडक केले असल्याची माहिती गडकरी यांनी दिली.

****

राज्यसभेत कालही गदारोळ कायम राहिला. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेली घोषणाबाजी आणि त्याला सत्ताधारी खासदारांनी दिलेलं उत्तर, यामुळे उद्‌भवलेल्या गदारोळामुळे सभापतींनी कामकाज प्रथम दुपारी २ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

****

अदानी समूहाच्या कथित लाचखोरी प्रकरणी संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशीच्या मागणीसाठी काल संसद परिसरात विरोधी पक्षानं आंदोलन केलं. या आंदोलनात काँग्रेस, मार्क्सवादी आणि इतर विरोधी पक्षाचे खासदार सहभागी झाले होते.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात भारताच्या बँकिंग क्षेत्रात विशेषतः सार्वजनिक बँकांमध्ये आमुलाग्र बदल झाले, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांचा पैसा भ्रष्टाचारासाठी वापरला जात असल्याचा, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेला आरोप तथ्यहीन असल्याचं सीतारामन यांनी समाज माध्यमांवरच्या संदेशातून स्पष्ट केलं आहे.
दरम्यान, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी २०२३-२४ या वर्षात एक लाख ४१ हजार कोटी रुपये इतका आतापर्यंतचा सर्वाधिक निव्वळ नफा नोंदवला असून, बँकांच्या सकल अनुत्पादक मालमत्तेत घट झाली आहे. यामध्ये मार्च २०१८ मधल्या १४ पूर्णांक ५८ टक्के सर्वोच्च स्तरावरून, सप्टेंबर २०२४ मध्ये तीन पूर्णांक १२ टक्के घसरण झाली असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

संसदेवरच्या दहशतवादी हल्ल्याचा आज २३ वा स्मृतिदिन आहे. १३ डिसेंबर २००१ रोजी पाच दहशतवाद्यांनी केलेल्या या हल्ल्यात सहा पोलिस, संसद सुरक्षा दलातले दोन कर्मचारी आणि एक माळी हुतात्मा झाला होता. हा हल्ला मोडून काढतांना, पाचही दहशतवादी मारले गेले होते.

****

छत्तीसगडमध्ये काल सुरक्षा दलांच्या शोधमोहिमेदरम्यान झालेल्या चकमकीत सात नक्षलवादी ठार झाले. नारायणपूर जिल्ह्यात, केंद्रीय राखीव पोलीस दल, विशेष तपास पथक आणि जिल्हा राखीव दलाने काल सकाळी संयुक्तपणे राबवलेल्या शोधमोहिमेदरम्यान ही चकमक झाली.

****

'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने ११ डिसेंबरपर्यंत एक लाखांहून अधिक पंप बसवण्याचा टप्पा ओलांडला आहे. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ही माहिती दिली. राज्यात ११ डिसेंबरपर्यंत एकूण एक लाख एक हजार ४६२ सौर कृषी पंप बसवण्यात आले आहेत. यामध्ये सर्वाधिक १५ हजार ९४० पंप जालना जिल्ह्यात बसवण्यात आले आहेत. बीड जिल्ह्यात १४ हजार ७०५, परभणी - नऊ हजार ३३४, अहिल्यानगर - सात हजार ६३०, छत्रपती संभाजीनगर - सहा हजार २६७ आणि हिंगोली जिल्ह्यात सहा हजार १४ पंप बसवण्यात आले आहेत.

****

फिडे बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत अटीतटीच्या लढतीनंतर भारताचा डी. गुकेश विश्वविजेता ठरला आहे. गुकेश हा विश्वनाथन आनंदनंतर बुद्धिबळ विश्वविजेता ठरलेला दुसरा भारतीय तर सर्वात कमी वयाचा पहिला बुद्धिबळपटू ठरला आहे. गुकेश आणि चीनचा डिंग लिरेन यांच्यात झालेल्या या अंतिम सामन्याच्या पहिल्या १३ फेऱ्या बरोबरीत सुटल्या होत्या, काल झालेल्या अखेरच्या लढतीत गुकेशने डिंग लिरेनचा पराभव केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या यशाबद्दल गुकेशचं अभिनंदन केलं आहे.

****

आगामी हॉकी इंडिया लीगचं थेट प्रक्षेपण करण्यासाठी प्रसार भारतीनं हॉकी इंडियासोबत सामंजस्य करार केला आहे. या सामंजस्य करारामुळे, हॉकी इंडिया लीग २०२४-२५ साठी दूरदर्शन अधिकृत प्रसारण भागीदार झालं आहे. येत्या २८ डिसेंबर ते एक फेब्रुवारी या कालावधीत ही स्पर्धा होणार आहे.

****

केज तालुक्यातल्या मस्साजोग इथले दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी काल भेट घेऊन सांत्वन केलं. ९ डिसेंबर रोजी घडलेल्या हत्येत सहभागी सर्व गुन्हेगारांना तातडीने अटक करावी, अशी मागणी यावेळी त्यांनी केली. सोमवारपासून नागपूर इथं सुरू होणाऱ्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात आपण हा मुद्दा मांडणार असल्याचंही दानवे यांनी सांगितलं.

दरम्यान, दानवे यांनी काल परभणी इथं जाळपोळ, दगडफेक आणि व्यापारी आस्थापनांची तोडफोड केलेल्या ठिकाणांची पाहणी केली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला त्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. झालेला प्रकार निंदनीय असल्याचं दानवे यांनी नमूद केलं.

****

दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ हिंगोली शहरात काल कडकडीत बंद पाळण्यात आला. कळमनुरी तालुक्यातल्या आखाडा बाळापूर, हिंगोलीतल्या कनेरगाव नाका तसंच जवळा बाजार इथं सर्व व्यापारपेठा बंद ठेवून घटनेचा निषेध करण्यात आला.

****

परभणी जिल्ह्यात शांतता, कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली काल शांतता समितीची बैठक झाली. जिल्ह्यात झालेल्या हिंसाचारानंतर नुकसानाचे पंचनामा करण्यास सुरुवात झाली असून, नुकसानग्रस्तांना भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल, तसंच दोषीवर कारवाई केली जाईल, असं गावडे यांनी सांगितलं. जिल्ह्यात शांतता आणि सौहार्दाचं वातावरण राखण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

****

नांदेड इथं झालेल्या शांतता समितीच्या बैठकीत जिल्ह्यात शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याचं आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केलं आहे. या बैठकीत संविधानाच्या प्रास्ताविकेचं सामुहिक वाचन करण्यात आलं.

****

बीड जिल्ह्यात अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी २७ डिसेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश जारी केले आहेत. येत्या १६ डिसेंबरपासून सुरु होत असलेलं विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन, तसंच आगामी दत्त जयंती उत्सवाच्या अनुषंगाने कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी हे मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत.

****

धाराशिव शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गासाठीचा वळणरस्ता लवकरात लवकर करावा या मागणीसाठी काल नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केलं. या आंदोलनात शालेय विद्यार्थी पालक तसेच सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या आंदोलनामुळे काही काळ वाहतुक कोंडी झाली होती.

****

नांदेड इथं आजपासून राजस्तरीय युवा महोत्सवाला सुरुवात होत आहे. या महोत्सवातून महाराष्ट्र राज्याचा संघ राष्ट्रीय युवा महोत्सवाकरता निवडण्यात येणार आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर इथं येत्या ११ जानेवारी रोजी राज्यस्तरीय आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. 'स्पर्धा तुळजाभवानीची

: वक्ता महाराष्ट्राचा` या स्पर्धेचं हे सोळावं वर्ष आहे. विविध वयोगटात या स्पर्धा होणार आहेत.

****

नांदेड जिल्ह्यात श्रीक्षेत्र माहूर इथं दत्तशिखर गडावर कालपासून दत्त जयंती उत्सव सोहळ्याला प्रारंभ झाला. १७ डिसेंबरला काकड आरतीने दत्त जयंती उत्सवाची सांगता होईल .या सोहळ्यानिमित्त माहूर आगारातून अतिरिक्त एसटी बस सोडल्या जात आहेत.

****